


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १२५ ●सोमवार, दि. ०४ ऑगस्ट २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

## शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी

## 'सीसीआय'कडून कापसाला 8,100 रुपयांचा भाव

**जळगाव । प्रतिनिधी**

जिल्ह्यात यंदा सात लाख हेक्टरवर खरीप पिकांची लागवड झाली आहे. असे असले तरी पांढरे सोने असलेल्या कापूस लागवडीत दीड लाख हेक्टरची घट झाली आहे. दुसरीकडे आर्थिक स्थैर्य देणाऱ्या मका, सोयाबीनची निवड शेतकऱ्यांनी केली आहे.



गेल्या वर्षीपर्यंत कापसाला व्यापाऱ्यांसह सीसीआयने कमी दर दिला होता. यंदा मात्र सीसीआयकडून आठ हजार शंभर रूपये प्रतिक्विंटल शेतकऱ्यांच्या कापसाला भाव दिला जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. 'सीसीआय'कडून गतवर्षी कापसाला साडेसात हजारांचा भाव दिला गेला. मात्र 'सीसीआयकडे अगोदर नोंदणी, आधारकार्ड बँक खाते लिंक करून द्यावे लागते. त्यात कापूस मोजताना होणारी कपात शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम करते. त्यातही काही महिन्यांनी पेमेंट होते. यामुळे शेतकरी सीसीआयकडे कापूस विकतात. मात्र अती गरजवंत शेतकरी व्यापाऱ्यांना कापूस म ोजून लागलीच पैसे घेऊन मोकळे होतात. हा आजवरचा अनुभव. व्यापाऱ्यांनी कापसाची प्रतवारी पाहूनच गतवर्षी सात हजार ते सात हजार दोनशेपर्यंत भाव दिला होता. कापसाचा भाव वाढेल, या आशेने शेतकऱ्यांनी कापूस घरात ठेवला. शेवटी मिळेल त्या भावात कापूस व्यापाऱ्यांना विकावा लागता. कारण सीसीआयने हंगाम संपण्यापूर्वीच कापूस खरेदी केंद्रे बंद केली होती.

यंदाच्या हंगामासाठी प्रतिछिटत ८ हजार १०० रुपयांचा भाव जाहीर झाला आहे. व्यापाऱ्यांनी कापसाला सात ते सात हजार तीनशेवर भाव दिलेला नाही. यामुळे 'सीसीआयच्या तोडीने ८,१०० भाव व्यापारी कापसाला देतील का? हा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. व्यापारी किती भाव

▶▶ उर्वरित पान २ वर

## मनोज जरांगे लिफ्ट अपघातातून बचावले

## शिवाजीराव क्रिटिकल रुग्णालयातील प्रकार

**जरांगे यांच्यासह सर्व सहकारी सुखरूप ; राज्यभर दौरे सुरू राहतील ; जरांगे पाटील**



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील शिवाजीराव क्रिटिकल रुग्णालयात एका रुग्णास भेटण्यासाठी रविवारी मनोज जरांगे पाटील आपल्या सहकार्यासोबत गेले असता पहिल्या मजल्यावरून खाली येत असताना लिफ्ट नादुरुस्त झाली व थेट ग्राउंड फ्लोअरला येऊन आदळली आवाज एवढा मोठा होता की परिसरातील नागरिकांनी व रुग्णालयात आलेल्या नातेवाईकांनी तात्काळ लिफ्टच्या दिशेने धाव घेतली. सुदेवाने यामध्ये मनोज जरांगे यांच्यासह सर्व सहकारी सुखरूप होते. बीड दौऱ्यावर असताना ही घटना घडली. बीड शहरातील एका

▶▶ उर्वरित पान २ वर

### ●मनोज जरांगे यांचे दौरे सुरूच

जरांगे पाटील यांचे मराठा आरक्षणासाठी राज्यभर दौरे सुरू आहेत. बीड, जालना, अहमदनगर, धाराशिवसह विविध ठिकाणी कार्यक्रमांना ते उपस्थित राहत आहेत. लवकरच ते मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईकडे कूच करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. आरक्षण मिळाल्याशिवाय परतीचा मार्ग नाही, असा निर्धार मनोज जरांगे यांनी यापूर्वीच केला आहे.

### ●निर्णायक लढा देण्याचा निर्धार

अंतरवाली सराटी येथे उपोषण करून राज्य सरकारला दबावात आणले होते. त्यानंतर सरकारकडून आश्वासन मिळाल्याने त्यांनी आंदोलन स्थगित केले. परंतु आता पुन्हा ते मराठा आरक्षणाच्या आंदोलनासाठी अधिक ठामपणे मैदानात उतरले असून, मराठा समाजासाठी निर्णायक लढा देण्याचा त्यांचा निर्धार आहे. यासाठी राज्यभर दौरे सुरू केले असून मराठवाड्यात सध्या मनोज जरांगे यांचे दौरा सुरू आहे.

## बँकेसमोरील पुरातन विहीर बुजवण्याच्या विरोधात 4 दिवसांपासून आमरण उपोषण

**खा. बजरंग सोनवणे यांची उपोषण स्थळी भेट**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरातील महाराष्ट्र बँकेशेजारी जुनी पुरातन विहीर अनेक वर्षापासून होती. ही विहीर नगर परिषदेने बुजवुन त्याठिकाणी अनाधिकृतपणे गाळे बांधकाम करुन ते भाडेतत्वावर दिलेले आहेत. सदरील जागेवरील अतिक्रमण काढून विहीर मोकळी करुन विहीर पुर्वरत सुरु करावी या मागणीसाठी नगरपालिके समोर लोकजनशक्ती पार्टीच्या



कार्यकर्त्यांने उपोषण सुरु केले आहे. या उपोषणास खा. बजरंग सोनवणे यांनी रविवार भेट दिली.

महाराष्ट्र बँकेसमोर असलेली विहीर बुजवून त्याठिकाणी सुरु केलेले गाळे बंद करुन विहीर म ोकळी करण्यासाठी नगर पालिकेला निवेदन देण्यात आले होते. तसेच सर्व अंबाजोगाई शहरामध्ये भिक मांगो आंदोलन करण्यात आले होते. परंतु नगर परिषदेने याची दखल न घेता सदर अतिक्रमण अद्यापपर्यंत काढलेले नाही. या विरोधात लोकजनशक्ती पार्टी युवक आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक बन्सी काळे पाटील यांनी मागील ४ दिवसांपासून आमरण उपोषण सुरु केले आहे. मागील चार दिवसापासून तोडगा निघाला नसल्याने आमरण उपोषण सुरुच आहे.

खा. बजरंग सोनवणे यांची उपोषण स्थळी भेट- पुरातन वारसा असलेल्या विहिरीच्या जपणुकीसाठी सुरु असलेला हा लढा अत्यंत महत्त्वाचा आहे. लोकशाही मार्गाने प्रश्न मांडणाऱ्या

▶▶ उर्वरित पान २ वर

## वैराग्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा: इंदोरीकर महाराज

**श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे भाविक भक्तांची पहिल्याच दिवशी प्रचंड गर्दी**



**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल म ार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे पहिले कीर्तन सेवा निवृत्तीनाथ महाराज इंदोरीकर यांचे संपन्न झाले. प्रथम कीर्तन पुष्प अर्पण करताना अभंग विवेचन करताना माणसाने जीवन जगताना काम, क्रोध, मद, लोभ, मोह,म त्सर हे सहा विकार माणसाला पशु

▶▶ उर्वरित पान २ वर

## २.५० लाख शिक्षकांच्या वेतन देयकाचे वांदे होणार, स्वाक्षरी करण्यास नकार

**पुणे । प्रतिनिधी**

बनावट शालार्थ आयडी प्रकरणात सुरू असलेल्या अटकसत्राने आता राज्यातील शेकडो अधिकाऱ्यांमध्ये असंतोष उफाळला आहे. हे अटकसत्र न थांबविल्यास यापुढे राज्यातील अडीचलाखांवर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकावर स्वाक्षरीच करणार नाही, असा गर्भित इशारा अधिकाऱ्यांनी दिला आहे. शासनालाशिक्षक भरतीवर बंदी असतानाही राज्यात अनेक ठिकाणी बॅक डेटेड नियुक्त्या



झाल्या, तर नागपूर विभागात शेकडो शिक्षकांचे बनावट शालार्थ आयडी तयार करून कोट्यवधींचे पगार अदा करण्यात आले. या प्रकरणात आतापर्यंत शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी यासारख्या अनेक अधिकाऱ्यांना पोलिसांनी अटक केली.त्यानंतर आता संस्थाचालक, शिक्षकांचेही अटकसत्र सुरू झाले आहे.या अटकसत्राच्या विरोधात आता अखिल महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेच्या नेतृत्वात महाराष्ट्रातील सर्व अधिकारी एकवटले आहेत.

शुक्रवारी (दि. १) दोनशेपेक्षा अधिक अधिकाऱ्यांनी पुण्यात धाव घेत शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांची भेट घेतली. शालार्थ प्रणालीची परिपूर्ण माहिती न घेता शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना अटक

▶▶ उर्वरित पान २ वर

## काय उखडायचं ते उखडा... संजय राऊतांचे ओपन चॅलेंज

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठी भाषेसंदर्भात आम्ही हिंसाचार करणार, काय उखाडायचे ते उखडा. देवेंद्र फडणवीस हा महाराष्ट्र आहे, चांद्यापासून बांद्यापर्यंत हे राज्य मराठी माणसांचे आहे. आमच्या १०६ हुतात्म्यांनी इथे बलिदान दिले आहे. तुम्ही दिलेले नाही. तुम्ही राज्याचे तुकडे करणारे लोक आहात. आज तुम्ही राज्याचे मुख्यमंत्री आहात म्हणून जरा गप्प आहात, ज्या दिवशी तुम चे मुख्यमंत्रिपद जाईल, तेव्हा तुम्ही वेगळा विदर्भ मागणार आहात,



असा घणाघात शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केला.

खोक्याची भाषा फडणवीसांनी करु नये- संजय राऊत यांनी नुकतंच पत्रकारांशी संवाद साधला. देवेंद्र फडणवीसांनी नुकतंच एका मुलाखतीदरम्यान मराठी भाषेच्या नावे हिंसा होत असेल तर त्यावर कारवाई करणार असे म्हटले होते. त्यावर संजय राऊत यांनी भाष्य केले. देवेंद्र फडणवीस यांचे जे सरकार आहे, या सरकारची निर्मिती खोक्यातून झाली आहे. ज्यांनी ५० खोके एकदम ओके अशी घोषणा कैलास गोरंट्याल यांनी दिली होती. त्यावेळी ते आम दार होते. यांनी विधानभवनाच्या आवारात विधानसभा सुरु असताना ही घोषणा त्यांनी दिली आणि मग ती देशात पसरली. आता ५० खोके एकदम ओके बोलणारे कैलास गोरंट्याल हे देवेंद्र फडणवीस यांच्या पक्षात आहे. कैलास गोरंट्याल यांनी सांगितलं आहे की एका एका मतदार संघात निवडणूक जिंकण्यासाठी १०० कोटी खर्च केले. सरकारी वाहन, पोलिसांच्या वाहनातून पोलिसांचे वाटप सुरु होते. त्यानंतर गोरंट्याल असे म्हणतात की आमच्यासारखे कार्यकर्ते याला कुठे पुरे पडणार. त्यामुळे मला भाजपात यावं लागलं हे काल

▶▶ उर्वरित पान २ वर

## सरकारचा पैसा आहे, आपल्या बापाचं काय जातंय? संजय शिरसाटांचे विधान; सुप्रिया सुळे म्हणाल्या, "इशारा देऊन पण..."

**मुंबई । प्रतिनिधी**

बेडरुम व्हिडीओमुळे वादाच्या भोवऱ्यात अडकलेले सामाजिक न्याय मंत्री संजय






शिरसाट यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. अकोल्यातील एका कार्यक्रमात बोलताना मंत्री निधी मागा, सरकारचा पैसा आहे. आपल्या बापाचं काय जाताय?

असं वादग्रस्त वक्तव्य केलं. संजय

▶▶ उर्वरित पान २ वर

## लॉकेट घालण्याच्या बहाण्याने बंद करायला लावले डोळे... गर्भवती पत्नीची चाकू आणि ब्लेडने हत्या

**वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशातील मेरठमधील गंगानगर येथील अम्हेडा गावात शनिवारी सकाळी एक हादरवणारी घटना घडली. येथे एका तरुणाने आपल्या सात महिन्यांच्या गर्भवती पत्नीची चाकू आणि ब्लेडने हत्या केली. आरोपीने स्वतःहून पोलिसांना फोन करून पत्नीच्या हत्येची माहिती दिली. आता या तरुणाने नेमकी हत्या का केली? असा प्रश्न सर्वांना पडला आहे. चला जाणून घेऊया



माहितीनुसार, अम्हेडा गावातील भावनपूर येथील रहिवासी रविशंकर याने आपली पत्नी सपना (वय २६) यांची चाकूने भोसकून आणि ब्लेडने वार करून हत्या केली. आरोपीने सात महिन्यांच्या गर्भवती पत्नीला गळ्यात लॉकेट घालण्याच्या बहाण्याने डोळे बंद करायला सांगितले आणि नंतर तिचा गळा दाबून सुमारे २० वेळा वार केले. यामुळे गर्भातील बाळाचाही मृत्यू झाला. आरोपीने स्वतः पोलिसांना कॉल करून या घटनेची माहिती दिली. पोलिसांनी आरोपीला अटक करून चौकशी सुरू केली आहे. सीओ सदर देहात शिवप्रताप सिंह यांनी सांगितले की, सपनाचे लग्न याच वर्षी जानेवारी महिन्यात झाले होते. सपना पाच दिवसांपूर्वी आपल्या बहिणीच्या घरी आली होती. रविशंकरने पत्नीवर संशय घेतल्यामुळे ही हत्या केल्याचे चौकशीत समोर आले आहे. रविशंकरने पोलिसांना सांगितले, मी सपनाला सांगितले

▶▶ उर्वरित पान २ वर

# विरोधकांकडून निवडणुकीपुरतीच स्टंटबाजी, बीडकरांचे मूलभूत प्रश्न सुटेना

सत्ताधारी असो की विरोध बीड शहरातील मूलभूत प्रश्न त्यांना वर्षानुवर्ष सुटलेल्या नाहीत. गेल्या २ महिन्यापूर्वी बीड पालिकेच्या निवडणूक संदर्भात चर्चा होताच विरोधक खडबडून जागे झाले. अन् जनतेच्या प्रश्नांसंदर्भात आवाज उठवला. त्यानंतर निवडणुकीची चर्चा बंद होताच विरोधकही गप्प बसले.

आता निवडणूका लागल्या की पुन्हा या विरोधकांना जाग येणार आणि आम्हाला किती बीडकरांचा पुळका आहे. हे दाखवण्यासाठी पुन्हा मोर्चा, उपोषण, आंदोलन होणार

हे प्रश्न कायम.-१) २ वर्षापासून स्वच्छतेचे टेंडर नाही : बीड नगर पालिका एकमेव असेल तेथे दोन वर्षापासून स्वच्छतेचे टेंडरच नाही. त्यामुळे वार्डात घंटागाडी येत नाही. नागरिक घरातील कचरा रस्त्यावर फेकतात. त्यामुळे नाल्या तुंबून घाण होते. पालिका वर्षातून एकदा नाली साफ करते.





२) जालना रोडचे अर्धवट काम, रस्त्याच्या बाजूचे साईट पट्टे न भरल्याने रस्त्याच चिखल, त्यामुळे संपूर्ण शहरात प्रचंड धूळ, दुभाजकही केले नाही. दोन्ही बाजूने नाल्या न केल्याने पावसाळ्यात गटाराचे पाणी रस्त्यावर येते.

३) अंबिका चौक ते जालना रोड हा रस्ता अर्धवट ठेवल्याने येथे मोठ्या प्रमाणात धूळ उडते, खड्यामुळे बीडकरांना मोठा त्रास

४) शहरातील महत्वाचा रस्ता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते बलभीम चौक- बिंदुसरा नदी पात्र, जिल्हा क्रीडा संकुल रस्ता, तहसीलच्या पाठीमागून बारकुल हॉस्पिटल रस्ता, धानोरा रोड, यासह महत्वाचे रस्ते अनेक रस्ते करण्यात आलेले नाहीत.

५) जे रस्ते झाले आहेत. त्या दोन्ही रस्त्याच्या मधील पॅच कोठे भरलेला नाही तर कोठे एक रस्ता खाली तर दुसरा रस्ता एक फुटाने वर करण्यात आला आहे. त्यामुळे १०० मीटरच्या आत हे रस्ते खाली वर झालेले आहेत.

६) पालिका कागदोपत्री कोट्यावधी रूपयांचे विकास कामे करत आहेत. मात्र हे केवळ गुत्तेदार पोसण्यासाठी राबवलेला एक कार्यक्रम आहे.

७) सर्वात महत्वाचे म्हणजे ज्याचं जळत त्यालाच काही देण घेण नाही, होय पालिकेच्या गलथान कारभाराचा त्रास बीडकरांना होत आहे. मात्र या संदर्भात कोणालाही काहीही देण घेण नही. कारण गेल्या दोन वर्षापासून बीडमध्ये घंटागाडी येत नाही. एकदाही या संदर्भात सामान्य नागरिकांनी ना मुख्याधिकाऱ्यांना, ना नगरसेवकांना जाब विचारला. रस्त्यावर प्रचंड धूळ, मोठ मोठे खड्डे, नाल्या तुंबल्याने ज्यांच्या घरात पाणी शिरते त्या नागरिकांना आम्ही पत्रकार म्हणून त्यांची प्रतिक्रीया विचारली तर आमचे नाव पेपरमध्ये छापू नका म्हणतात. हेच नागरिक पालिकेला, घर पट्टी, पाणी पट्टी, घन कचरा व्यवस्थापन कर भरतात मात्र स्वात:ला त्रास होत असतांना आवाज का? उठवत नाहीत. या प्रश्नांवर विरोधकही केवळ निवडणूक आल्यानंतरच स्टंटबाजी करत आहेत. सर्वसामान्य नागरिकांमधून संतापच्या भावना.

◆ पान १ वरून पुढे...

## शेतकऱ्यांसाठी आनंदाची...

कापसाला देतात यावरूनच व्यापाऱ्यांमध्येच खल होईल. खरेदी केंद्र लवकर सुरू करावे. आक्टोबरमध्ये नवीन कापूस बाजारात येतो. सर्वप्रथम काही व्यापारी कापूस जादा दराने खरेदी करतो. यामुळे शेतकऱ्यांच्या कापसाच्या भावाविषयी आकांक्षा वाढतात. मात्र नंतर व्यापारी कमी भावाने कापूस घेतात. यात शेतकरी नाडला जातो. या पुढील काळात असे होऊ नये, अशी घशेतकरी अपेक्षा करीत आहे. मात्र 'सीसीआयने हंगाम सुरू होताच खरेदी केंद्रे सुरू केली तरच शेतकरी कापूस 'सीसीआयकडे देतील. त्यादृष्टीने 'सीसीआयने आतापासूनच खरेदी केंद्र सुरू करण्यासाठी हालचाली सुरू करणे अपेक्षित आहे. सोयाबीनची लागवड वाढली. यंदा भुईमूगऐवजी सोयाबीनची लागवड वाढली आहे. यात घट झालेले पिकनिहाय क्षेत्र असे भुईमूग १०४५ हेक्टर, करडई, सूर्यफूल २९ आणि तीळ १०४ हेक्टर आदी तेलबीया उत्पादन लागवडीत घट झाली आहे. मात्र सोयाबीन लागवडीत १९ हजार ४९८ हेक्टरऐवजी प्रत्यक्षात ३५ हजार हेक्टर म्हणजेच दुप्पट वाढ झाली आहे. सरासरी २१ हजार २९२ हेक्टरऐवजी ३६ हजार २०८ हेक्टर म्हणजेच तेलबीया वर्गीय वाणांच्या लागवडीत १५ हजार हेक्टर वाढ झाली.

## मनोज जरांगे...

खासगी रुग्णालयात रुग्णाच्या भेटीसाठी आले असताना, त्यांच्यासह काही सहकारी लिफ्टमधून खाली उतरत होते. याचवेळी लिफ्टने अचानक नियंत्रण गमावले आणि पहिल्या मजल्यावरून थेट जमिनीवर कोसळली. रविवारी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास ही घटना घडली. सुदैवाने या घटनेत कुणालाही दुखापत झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, मनोज जरांगे बीड दौऱ्यावर असताना शहरातील शिवाजीराव क्रिटीकल केअर हॉस्पिटलमध्ये रुग्णाला भेटण्यासाठी ते आले होते. भेट झाल्यानंतर पहिल्या मजल्यावरून तळमजल्यावर येण्यासाठी ते लिफ्टमध्ये बसले. त्यावेळी, अचानक लिफ्ट बिघडल्याने अपघाताची घटना घडली. वरच्या मजल्यावरून लिफ्ट थेट जमिनीवर येऊन आदळली. लिफ्टचा मोठा आवाज झाल्याने आसपासच्या लोकांनी तातडीने तळमजल्याकडे धाव घेतली. लिफ्टमध्ये अडकलेले मनोज जरांगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना दरवाजे तोडून बाहेर काढण्यात आले. सुदैवाने या अडकलेले मनोज जरांगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना दरवाजे तोडून बाहेर काढण्यात आले. सुदैवाने या अपघातात कुणालाही गंभीर दुखापत झाली नाही. त्यामुळे, अनेकांचा जीव भांड्या पडला होता.

◆ पान १ वरून पुढे...

## बँकेसमोरील पुरातन...

प्रत्येकाच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहीले पाहीजे हे ओळखून खा.बजरंग सोनवणे यांनी उपोषण कर्ते अशोक बन्सी काळे पाटील यांची उपोषण स्थळी जाऊन चौकशी केली. यावेळी खा. सोनवणे यांच्या बरोबर माजी आ. पृथ्वीराज साठे, राष्ट्रवादी गटाचे तालुकाध्यक्ष अमर देशमूख, लोकजनशक्ती पार्टीचे राजेश वाव्हुळे, इस्माईल गवळी, मदनलाल परदेशी, रवी देशमुख, हमीद चौधरी, गणेश घाडगे इत्यादी उपस्थित होते. नगरपालिकेचे लेखी आश्वासन, परंतू उपोषण सुरुच - खा. बजरंग सोनवणे यांनी उपोषण स्थळी भेट दिल्यानंतर नगरपालिकेच्या वतीने स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे यांनी उपोषण कर्ते अशोक बन्सी काळे पाटील यांना मुख्याधिकरी यांनी दिलेले लेखी पत्र दिले. परंतू दिलेल्या पत्रात विहीरीवरील अतिक्रमण काढणार म्हणून ठोस आश्वासन दिलेले नाही. यामुळे उपोषण मरेपर्यंत सुरु राहील असे उपोषणकर्ते काळे यांनी लेखी दिले आहे.

## वैराग्याचे मूर्तिमंत...

बनवतात माणसाला या सहा विकार मत केली की माणसाचा देव माणूस होतो. तुम्हाला जिवंत देव पाहायचं असेल तर गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुवर्य शांतीब्रह श्री नवनाथ बाबा महाराज हे होय आयुष्यात संसार, प्रपंच या सर्वांचा त्याग करून वैरागी आयुष्य माणसाने जगाव या कलियुगात वैराग्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज हे होय असे प्रतिपादन श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह मध्ये प्रथम कीर्तन पुष्प अर्पण करताना समाज प्रबोधकार निवृत्ती महाराज इंदोरीकर यांनी केले श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताहास टेकडी परिसरातील भाविक भक्तांनी प्रचंड गर्दी केली या वेळी साधू संताच्या सोबत राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते

## २.५० लाख...

केली जात आहे. शिक्षण विभागाची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय अधिकाऱ्यांना अटक करू नये, अशी मागणी यावेळी आयुक्तांकडे करण्यात आली. लावण्यासाठी राज्यातील दोनशेपेक्षा अधिक अधिकाऱ्यांनी आयुक्तांची भेट घेतली. तसेच आयुक्त कार्यालयापुढे घोषणाबाजी केली. या आंदोलनाचे नेतृत्व तिन्ही शिक्षण संचालकांनी केले. प्राथमिकचे शरद गोसावी, माध्यमिकचे डॉ. महेश पालकर आणि योजना शिक्षण संचालक कृष्णकुमार पाटील यांच्या नेतृत्वात अधिकाऱ्यांनी आपल्या मागण्या आयुक्तांकडे सादर केल्या. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या मनात कोणत्याही वेळी अटक होण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे या

◆ पान १ वरून पुढे...

अटकसत्रापासून संरक्षण देण्यासाठी शासनाने लेखी हमीपत्र द्यावे, अशी मागणी अखिल महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेने केली आहे. हे लेखी हमीपत्र न मिळाल्यास यापुढे शिक्षकांच्या वेतन देयकावर स्वाक्षरीच करणार नाही, असा आक्रमक पवित्रा या अधिकाऱ्यांनी घेतला. तसेच ८ ऑगस्टपासून सामूहिक रजा आंदोलनाचा इशाराही दिला आहे. त्यामुळे पुढील महिन्यात अडीचलाखांपेक्षा अधिक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन वांद्यात येण्याची शक्यता आहे.

## काय उखडायचं...

कैलास गोरंट्याल म्हटले आणि आज भाजपात आले. तेव्हा खोक्याची भाषा फडणवीसांनी करु नये, असे संजय राऊत म्हणाले. राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांनी १०० जागांवर कशाप्रकारे हेराफेरी केली, याबद्दल जी मोहीम उघडली आहे, त्याबद्दल देवेंद्र फडणवीसांनी बोलायला हवं. त्यांच्या मंत्रिमंडळात जे मंत्री बसलेले आहेत, अजूनही त्यांच्याकडे खोक्यांची ओढाताण सुरु आहे, त्यावर त्यांनी बोलावं. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु आहेत, बेरोजगारी वाढते त्यावर त्यांनी बोलायला हवं. किती काळ तुम्ही उद्धव ठाकरेंवर अडकून पडणार आहात. आता उद्धव आणि राज एकत्र झालेत त्या धक्क्यातून ते सावरलेले नाहीत. त्यामुळे देवेंद्र फडणवीसांना गंमतीजंमती करायची सवय आहे, याकडे एक विनोद म्हणून पाहायला हवं, असेही संजय राऊतांनी म्हटले. मराठी भाषेसंदर्भात आम्ही हिंसाचार करणार, काय उखाडायचे ते उखडा. देवेंद्र फडणवीस हा महाराष्ट्र आहे, चांद्यापासून बांद्यापर्यंत हे राज्य मराठी माणसांचे आहे. आमच्या १०६ हुतात्म्यांनी इथे बलिदान दिले आहे. तुम्ही दिलेले नाही. तुम्ही राज्याचे तुकडे करणारे लोक आहात. आज तुम्ही राज्याचे मुख्यमंत्री आहात म्हणून जरा गप्प आहात, ज्या दिवशी तुमचे मुख्यमंत्रिपद जाईल, तेव्हा तुम्ही वेगळा विदर्भ मागणार आहात. मराठी भाषेसाठी प्रसंगी आक्रमक होण्याची गरज लागली तर ते आम्ही होणार. तुम्ही मुरारजी देसाई व्हायला जाताय का, आमच्यावर गोळ्या घालणार आहात तुम्ही मराठीचा आग्रह करतोय म्हणून. हो आम्ही करतोय मराठीचा आग्रह. आम्ही गुजरातला जाऊन मराठीचा आग्रह करत नाही. तुमच्या गुजरातमध्ये आधी हिंदी सक्ती करा मग महाराष्ट्रावर ती लादा, असे संजय राऊतांनी म्हटले. राज ठाकरे यांनी सांगितलेला मुद्दा अत्यंत महत्त्वाचा वीस लाख बिहारी आणि हिंदी भाषिकांना गुजरात मधून मारून हाकलून दिलं.. त्या अल्पेश ठाकूरला तुम्ही नंतर आमदार केला तुम्ही आम्हाला काय सांगत आहात. तुम्ही नरेंद्र मोदी आणि अमित शहा काय म्हणतात ते पहा अमित शहा बोलत आहेत आम्ही गुजराती मग मी मराठी का बोलू शकत नाही. शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे .देवेंद्र फडणवीस का तुम्हाला

◆ पान १ वरून पुढे...

काय करायचं आहे ते करा. देवेंद्र फडणवीस हे अपयशी मुख्यमंत्री त्यांचा फक्त फुगा फुगवला आहे, जसे नरेंद्र मोदी यांची हवा भरले फुग्यात आहे कसे देवेंद्र फडणवीस यांच्यात हवा भरली आहे, असेही संजय राऊत म्हणाले.

## सरकारचा पैसा...

शिरसाट यांच्या या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. संजय शिरसाट यांच्या या वक्तव्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट त्यांच्या वादग्रस्त विधानामुळे चर्चेत आले आहेत. अकोल्यात आयोजित एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी सरकारचा पैसा आहे, आपल्या बापाचं काय जातंय? असे वक्तव्य केल्याचा व्हिडीओ व्हायरल होतोय. शिरसाट यांच्या या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा राजकारण तापण्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वीच संजय शिरसाट यांच्या बेडरुमधील व्हिडीओमुळे वाद निर्माण झाला होता, ज्यामध्ये त्यांच्या बाजूला पेशांची बॅग दिसत होती. त्याआधी लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचा पैसा वळता करण्यावरूनही संजय शिरसाट यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर राज्यातील मंत्र्यांच्या वादग्रस्त वक्तव्यांवरुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मंत्र्यांना जबाबदारीने बोलण्याची ताकीद दिली होती. मात्र आता पुन्हा मंत्र्यांकडून वादग्रस्त वक्तव्ये सुरुच असल्याचे पाहायला मिळत आहे. अकोल्याच्या निमवाडी परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या नूतन वास्तूचे लोकार्पण सामाजिक न्याय मंत्र्यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना त्यांनी आपल्या भागातील वसतिगृहासाठी निधीची मागणी करा.

## लॉकेट घालण्याच्या..

की डोळे बंद कर, मी तुला लॉकेट आणले आहे, ते स्वतःच्या हाताने तुझ्या गळ्यात घालणार आहे. तिने डोळे बंद केले आणि मी तिचा गळा रेतला. मात्र, सपनाच्या कुटुंबीयांनी यामागे हुंड्याचा आरोपही केला आहे. अम्हेडा येथील रहिवासी मुन्ना यांनी सांगितले की, त्यांचे लग्न सुमारे २० वर्षांपूर्वी लिसाडी गेट येथील जाटव गेट येथील सपनाच्या मोठ्या बहिणी ममता यांच्याशी झाले होते. लग्नानंतर सपनाच्या सासू-सासऱ्यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर ममताने आपली धाकटी बहीण सपना, जी तेव्हा सुमारे पाच वर्षांची होती, तिला आपल्या घरी आणले होते. मुन्ना आणि ममता यांनीच सपनाला शिक्षण दिले होते. त्यांनी याच वर्षी २३ जानेवारीला सपनाचे लग्न किनानगर येथील रविशंकर याच्याशी लावून दिले होते. रविशंकरची गावातच किराणाची दुकान् आहेत. पाच दिवसांपूर्वीच सपना त्यांच्या घरी आली होती.

◆ पान ४ वरून पुढे...

## आ. विजयसिंह...

सेवा सुरू नव्हती. बस गोरक्षनाथ टेकडी फाट्यावर थांबत नव्हत्या आणि त्यामुळे सात आठ किलोमीटर लोकांना पायी चालत जावे लागत असे त्या अनुषंगाने भाऊसाहेब डावकर, सरपंच तेजाब चव्हाण, उत्तरेश्वर जाधव व परिसरातील नागरिकांनी आ. विजयसिंह पंडित यांची भेट घेऊन बस सेवा सुरु करण्याची मागणी केली. आ. पंडित यांनी तात्काळ त्याची दखल घेऊन राज्य परिवहन महामंडळाकडे लेखी पत्र दिले. एस.टी. महामंडळाने आ. विजयसिंह पंडित यांच्या पत्राची दखल घेऊन त्या ठिकाणी बस सेवा सुरू केली आहे. त्यामुळे भाविक भक्तांचा गोरक्षनाथ टेकडीला जाण्यायेण्याचा प्रश्न निकाली निघाला आहे. बास सेवा सुरु झाल्यामुळे गोरक्षनाथ टेकडीचे मठाधिपती शांतीब्रह्म ह. भ. प. नवनाथ बाबा महाराज, ओमतात्या खवतड यांच्यासह परिसरातील नागरिकांनी आ. विजयसिंह पंडित आणि एस. टी. महामंडळाचे आभार मानले आहेत. आज भाविक भक्तांनी त्या ठिकाणी उत्साहामध्ये महामंडळाच्या बसचे स्वागत करुन आनंद साजरा केला. यावेळी भाऊसाहेब डावकर, तेजाब चव्हाण, कैलास देवकते, भास्कर देवकते, सतीश देवकते यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फार्मा डी...

नियंत्रित केला जातो यामध्ये पाच वर्षाची क्लीनिकल रिसर्च व औषध नियंत्रण विभागात महत्वपूर्ण योगदान दिले आहेत. २०१४ पासून पदवीधारकांनी रुग्णालय हेल्थकेअर सिस्टीम औषध सुरक्षा क्लीनिकल रिसर्च व औषध नियंत्रण विभागात महत्वपूर्ण योगदान दिले आहेत १६ जुलै २०१९ रोजी चा भारत सरकारचा गॅसेट अधिसूचना स्पष्टपणे नमूद करते की फार्मा डी.ही बी.फार्म, डी.फार्म पेक्षा समतोल किंवा उच्च पात्रता आणि उच्च पदवी धारक पात्रता आहे यासंदर्भात अधिकाऱ्यांनी त्वरित

◆ पान ४ वरून पुढे...

योग्य कारवाई करावी आणि फार्मा डीला पात्र मान्य करावे असे आव्हान डॉक्टर विनायक घायाळ, डॉक्टर प्रतीक शिंदे, डॉक्टर स्वप्नील मुंडे व डॉक्टर मनोज पिसुरे सह डॉक्टर फार्मसी असोसिएशन महाराष्ट्र यांनी केले आहे.

## पर्यावरण मंत्री...

यांच्या सहकार्यानेकरण्यात आले आहे. या उपक्रमाच्या निमित्ताने वृद्धाश्रमातील वृद्ध व्यक्तींना स्नेहभोजन, आरोग्य तपासणी आणि विविध सेवा कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवाजीराव फड तर प्रमुख उपस्थिती म्हणून भाजपा राज्य कार्यकारणी सदस्य सर्जेराव तात्या तांदळे, भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम भाई जहांगीर,प्रदेश उपाध्यक्ष अनिल चांदणे, बीड शहराध्यक्ष अशोक लोढा, बीड ग्रामीण मंडळाचे अध्यक्ष मनोज पाटील, बालाघाट मंडळाचे अध्यक्ष अशोक रसाळ,वडवणी मंडळ अध्यक्ष सुखदेव रेडे,विलास मोमीन, रिपाई नेते सुभाष तांगडे, मा सरपंच नागेश शिंदे,प्रा. तिडके तेजस,विठ्ठल नाना शिंदे,विलास बामणे,संजय काळे,अमोल वडतीले,हरीश खाडे,आप्पासाहेब झोडगे,नरेश पवार,महादेव नागरगोजे,अशोक घोडके,वामन मुंडे,बाळासाहेब हावळे, अशोक मुंडे,सटवा भाऊ मुंडे,वचिष्ट मुंडे,सोमनाथ मुंडे,गोरख मुंडे,नारायण मुंडे,अशोक घिगे,बाबासाहेब शिंदे,गणेश पवार,ज्ञानेश्वर बांडे,शाम राऊत,अशोक वैद्य, अंगद देवडकर,सचिन तीपटे,विशाल वाघमारे,गोरख बाबर,सुन्दर लांडे,गोविंद कोळेकर,रमेश लांडे,गाडे सर,मुलानी सर,बडे सर,विठल लांडे,उजगरे,संजय फड जावळे, मुळे, सूत्र संचलन अजिनाथ शेरकर यांनी केले यांच्या सह कार्यक्रम संपन्न करण्यासाठी ज्यांनी परिश्रम घेतले असे सुबोध फड ,कृ उ बा स संचालक नितीन फड,संतोष खवतड, बारीक कडेकर, महेश खवतड,बाबू फड बीड विधानसभेतील सर्व नूतन

◆ पान ४ वरून पुढे...

पदाधिकारी यांचा स्वागत समारंभ आयोजित केला होता.

समाजाच्या सर्व थरातील नागरिकांना एकत्र आणून पर्यावरण संरक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याचा एक उत्कृष्ट नमुना या उपक्रमातून साकारण्यात आला आहे.

श्री.चंद्रकांत फड यांचे सामाजिक योगदान केवळ पर्यावरणापुरते मर्यादित नसून, ते तरुणांना व्यसनमुक्त ठेवण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करतात तसेच गोरगरिबांना मदत, सुसंस्कृत आणि जागरूक तरुण घडविण्याच्या कार्यातही सक्रियपणे सहभागी असतात. त्यांच्या पुढाकाराने बीड जिल्ह्यातील बालाघाट डोंगररांग हिरवीगार करणे हे एक मोठे स्वप्न असून, त्यासाठी त्यांनी अनेक शासकीय, सामाजिक आणि राजकीय स्तरावर पाठपुरावा सुरू केला आहे.

## आंदोलनाचे शास्त्र....

नळ - गटार - रस्ते या तीन कामावर लक्ष केंद्रित करून आंदोलने करा. या पूर्वी संपूर्ण मराठवाड्यात आपण पाणी प्रश्नावर आंदोलने केली यांची दखल या सरकारला घ्यावी लागली असल्याचे ताई म्हणाल्या. यावेळी जिल्हाप्रमुखासह शिसैनिकांनी ताईचा आदर सत्कार केला. यावेळी ज्येष्ठ शिवसैनिक तथा माजी पं. स. विलास महाराज शिंदे, महिला संघटिका मीराताई नवले, जिल्हा संघटक संजय महाद्वार ,जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, जिल्हा संघटक नितीन धांडे, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, उपजिल्हाप्रमुख अजिनाथ खेडकर ,तालुकाप्रमुख सोपान काका मोरे, केज तालुकाप्रमुख अशोक जाधव, कामगार सेनेचे रवि वाघमारे, माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे, पंकज कुटे, उपसरपंच प्रदीप कोटुळे, गणेश लोणकर, राजाभाऊ हुरकुडे, दादा साहेब सोनवणे, सतीश परदेशीं, दिलीप पवार

## बर्वे कुल...

◆ पान ४ वरून पुढे...

ताब्यात देण्यात आली. या छबिना पालखीचा वापर प्रत्येक शुक्रवारी तसेच पौर्णिमेला काढण्यात येणाऱ्या श्री योगेश्वरी देवीच्या छबिण्यासाठी करण्यात येणार असल्याचे देवल कमेटीकडून बर्वे परिवारास सांगितले. बर्वे कुल स्नेहवर्धक मंडळाची स्थापना १९७४ साली असून सन २०२४ हे मंडळाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरा करण्यात आहे. मंडळाच्या वतीने आजपर्यंत विविध मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी सहकार्य केले आहे. त्याचबरोबर रक्तदान शिबिर आयोजित करून वेळोवेळी गरजू रुग्णांना मदत करण्यात येते.महिला बचत गटांना त्यांच्या उन्नतीसाठी बाजारपेठ उपलब्ध होण्यास सहकार्य केले. विविध प्रकारच्या सामाजिक कार्यात देखील उत्स्फूर्त असा सहभाग बर्वे स्नेह मंडळाचा असतो. संपूर्ण महाराष्ट्रात या मंडळाचे एकूण दोन ते अडीच हजार सदस्य असून एक कुल एक कुटूंब या सौंज्ञावर आधारित बर्वे कुल स्नेहवर्धक मंडळ हे आपले कार्य करीत आहे. यावेळी बर्वे परिवाराच्या वतीने श्री योगेश्वरी देवीची देखील विधिवत पूजा करून दर्शन घेतले. मंदिर प्रशासनाचा वतीने मंदिर परिसरात केलेल्या सोयी सुविधा, स्वच्छता तसेच महाप्रसाद घेऊन समाधान व्यक्त केले. बर्वे स्नेहवर्धक परिवाराच्या वतीने श्री योगेश्वरी मंदिरास छबिना पालखी सप्रेम भेट देतांना देवल कमिटीचे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी, सचिव प्रा अशोक लोमटे, कोषाध्यक्ष शिरीष पांडे, सदस्य अमोल लोमटे, प्रविण दामा, सतीश लोमटे, डॉ .संध्या जाधव यांच्यासह मंदिर प्रशासनाचे अन्य सदस्य देखील उपस्थित होते. शेवटी देवल कमिटीच्या ते करत असलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल सर्व संचालक मंडळाचा बर्वे कुल स्नेहवर्धक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## माजी उपमुख्यमंत्री...

आ.सुरेश धस यांनी विजयसिंह मोहिते पाटील यांचा यथोचित सन्मान केला.यावेळी राजेंद्र सिंह भोसले, राजाभाऊ निंबाळकर,पत्रकार सचिन रानडे उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# गोरक्षनाथ टेकडी येथे संत महंतांच्या हस्ते सप्ताह सुरूवात

## कीर्तन, प्रवचन, अभंगवाणी, टेकडीपरिसर भक्तिमय







**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ पुण्यमारणार्थी महंत गुरुवर्य शांतीब्रह श्री नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहचा आरंभ शनिवारी सकाळी ११वाजता संत महंतांच्या हस्ते दीप प्रज्वलन तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री, महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर व गोपाळ महाराज शास्त्री करण्यात आले. गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते विधिवत गुरू पूजा करुन सप्ताहाची सुरूवात करण्यात आली. यावेळे परिसर भक्तीमय झाला.

गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज, तपोनिधी महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर, गोपाळ महाराज शास्त्री, आखाडानंद महाराज शास्त्री भवानी गड, वसंत महाराज लोळदगाव, जानकीराम महाराज घुमरे मैदा श्रीहरी महाराज पवार संत ज्ञानेश्वर माऊली बेदरकर, महादेव महाराज भारती, बाबुराव महाराज मुंडे आदी महंतांच्या हस्ते कलश स्थापना, कलश पूजन, गुरू पूजन, करण्यात आले . सर्व महंतांच्या हस्ते पुष्प फुले अर्पण करून अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात करण्यात आली.

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये संपूर्ण सप्ताह कीर्तन,प्रवचन, अभंगवाणी, अशा कार्यक्रमाने गोरखनाथ टेकडी परिसर भक्तिमय झाला. आहे. या वेळी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी परिसरातील असंख्य भाविक भक्तांना उपस्थित होते.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बोरीसावरगाव येथे रक्तदान शिबिर

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील बोरीसावरगाव येथे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले या सामाजिक उपक्रमात अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती बोरीसारगाव चे सरपंच वैजनाथ रामभाऊ देशमुख, उपसरपंच बाळकृष्ण रामलिंग यादव , माजी उपसरपंच अंगद श्रावण पोळ, ग्राम सदस्य अक्षय रावन पोळ, ग्राम सदस्य विनोद सटवा पोळ, ग्राम सदस्य



गंगाधर अंबादास पौळ जालिंदर पोळ , योगेश प्रकाश देशमुख , ज्योतीभाऊ मुळे , राजपाल भैया काकडे, रक्तदान शिबिर आयोजन, वीर फकीरा ग्रुप ने केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरज कुंडलिक पोळ , उपाध्यक्ष दत्ता नंदू राव पौळ सचिव सत्यजित महादेव पोळ खजिनदार साई बजरंग पोळ ,कार्यक्रमाचे सल्लागार अंगद श्रावण पोळ अजय भिवाजी पोळ गोविंदा तुळशीराम पोळ, दत्ता मारुती पोळ, नितीन बापू पोळ , प्रकाश धनराज पोळ, आकाश धर्म पोळ, राहुल संतोष पोळ , राहुल ज्ञानोबा पोळ, बालाजी बापू वाघमारे , आकाश हरिभाऊ पोळ, कुलदीप रमेश पोळ , कुणाल गुरुरोबा पौळ , आदींनी केले. सामाजिक उपक्रमाने जयंती साजरी केली

# अवयवदान पंधरवड्यास सुरुवात; आजपासून राज्यात जनजागृतीपर विविध उपक्रम

## आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी घेतली अवयवादानाची शपथ

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील अवयवदानाचे प्रमाण वाढावे व अवयवदानाच्या प्रतीक्षेतील रुग्णांना नवजीवन मिळावे यासाठी आजपासून विविध उपक्रमांनी अवयवदान पंधरवडा साजरा होत आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्वत: पुढाकार घेत अर्ज भरून अवयवादानाची शपथ घेतली आणि या अभियानाचा शुभारंभ केला. राज्यातील जनतेने या अभियानामध्ये सहभागी होऊन अवयवदानाची शपथ घ्यावी, असे आवाहन आरोग्यमंत्री आबिटकर यांनी केले आहे. अंगदान जीवनदान संजीवनी अभियान ३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान राज्यात राबविण्यात येत आहे. या कालावधीत व्यापक जनजागृती व समाजाभिमुख उपक्रम राबवण्याचे निर्देश मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत. या अभियानामध्ये शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, धार्मिक संस्था, आरोग्य संस्था व सामाजिक कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग असणार आहे. अवयवदान क्षेत्रात देश आणि राज्य स्तरावर काम करणाऱ्या संस्था रोट्टो, सोट्टो, विभागीय प्रत्यारोपण समन्वय समित्यां व झेडटीसीसी, मुंबई, पुणे नागपूर व छत्रपती संभाजीनगर यांच्या सहकार्याने हे अभियान राज्यभरात राबविण्यात येणार आहे.

# महिला दक्षता समिती प्रमाणे पुरुष दक्षता समिती राज्यात स्थापन करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी प्रसिद्ध अभिनेत्री अमृता फडणवीस यांना आश्रय सेवा केंद्राच्या वतीने निवेदन : शेख आयेशा

**मुंबई । प्रतिनिधी**

महिलांवर अत्याचार झाला तर त्यांना न्याय देण्यासाठी संपूर्ण राज्यभरात पोलिस स्टेशन अंतर्गत महिला दक्षता समिती कार्यरत आहे. त्यामुळे पीडित महिलांना न्याय मिळतो.मात्र जे पुरुष स्त्रियांच्या त्रासापासून त्रस्त झालेले आहेत त्यांना न्याय देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने पुरुष दक्षता समिती स्थापन करावी अशी मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आपण करावी अशी मागणी



आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा शेख आयेशा यांनी प्रत्यक्ष भेटून केली आहे.या भेटी मध्ये त्यांनी बऱ्याच वेळ विविध विषयावर सविस्तर सकारात्मक चर्चा केली. महाराष्ट्रामध्ये महिलांवर अत्याचार होतात.या अत्याचारांना न्याय मिळावा पिढीताना त्रासापासून मुक्तता मिळावी.यासाठी राज्यभरामध्ये पोलीस स्टेशन अंतर्गत महिला दक्षता समिती गठीत करण्यात आलेली आहे. मात्र महाराष्ट्रामध्ये महिलांकडून पुरुषांवर होणारे अत्याचार सुद्धा कमी नाहीत. अशा पीडित पुरुषांना न्याय मिळावा यासाठी राज्यातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत पुरुष दक्षता समिती गठीत करण्यात यावी. अशी मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पोलीस महासंचालक रश्मी शुक्लाजी यांना निवेदन देऊन आश्रय सेवा केंद्राच्या वतीने केली आहे. या मागणीला न्याय मिळावा यासाठी मुख्यमंत्र्यांकडे साकडे घालावे आणि राज्यातील पीडित पुरुषांना न्याय द्यावा अशी मागणी प्रसिद्ध अमृता फडणवीस यांना प्रत्यक्ष भेटून केली असल्याचे पत्रकार तथा आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्ष शेख आयेशा यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# हरिनाम सप्ताहातुन अध्यात्मिक संस्कार व भक्ती परंपरा जतन होते : राजेंद्र मस्के

## पोखरी(लिंबा) हरिनाम सप्ताहास 30 वर्षाची परंपरा..!

**बीड । प्रतिनिधी**

अखंड हरिनाम सप्ताहातुन नामस्मरण किर्तन भजनाची भक्ती परंपरा नवीन पिढी पर्यंत पोहचवण्याचे कार्य होते. हरिनाम सप्ताह म्हणजे सात दिवसांचा अध्यात्मिक उत्सव आहे, जो प्रत्येक व्यक्तीला अंतर्मुख करतो आणि समाजाला सकारात्मकतेचा संदेश देतो.हरिनाम सप्ताहात हरिपाठ,भागवत कथा, नामस्मरण, प्रवचन कीर्तन, भजन, आरती अन्नदान अशा भक्ती परंपरा संवर्धीत होतात.तर अध्यात्मिक संस्कार प्राप्त होतात. अखंड हरिनाम सप्ताह सामाजिक गरज आहे. असे विचार



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पोखरी लिंबा येथे अखंड हरिनाम सप्ताह सांगता प्रसंगी उपस्थित भाविक भक्तांसी संवाद साधताना व्यक्त केले. पोखरी लिंबा हे बीड जिल्ह्यातील पोखरी गाव हे सामाजिक भान असलेले आदर्श गाव असून लोकवर्गणीतून शैक्षणिक संकुल निर्माण करणारे हे अध्यात्मिक क्षेत्रातही एक दिलाने उपक्रम राबवतात. भक्ती आणि शिक्षणाची गुढी निर्माण करून समाधान च्या दिशेने येथील ग्रामस्थ प्रयत्नशील असतात. बंकटस्वामी मठाचे मठाधिपती महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, बेलेश्वर संस्थानचे तुकाराम महाराज भारती , राजेंद्र मस्के, व हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत काल अखंड हरिनाम सप्ताह सांगता समारोप संपन्न झाला. परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या पमाणात सहभागी झाले होते.

आध्यात्मिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी सरपंच बिबीशन मुळीक दत्तू दळवे, शाहू फाळके, अशोक फाळके दादासाहेब खिल्लारे, नवनाथ खिल्लारे, विष्णू साबळे, नवनाथ आडके छत्रभुज फाळके आदींनी बहु परिश्रम घेऊन हा सोहळा यशस्वी केला.

# क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात अभिवादन

**मुंबई । प्रतिनिधी**

क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा वर्मा यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव दिलीप देशपांडे, राजेंद्र बच्छाव, विजय शिंदे यांच्यासह मंत्रालयीन



अधिकारी आणि कर्मचारी यांनी पुष्प अर्पण करून वंदन केले.

# बेंचवर बसण्याच्या वादातून विद्यार्थ्यांचा तुफान राडा! एकाचा मृत्यू

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकच्या सातपूर परिसरात एका धक्कादायक घटनेनं खळबळ उडाली आहे. अशोकनगरमधील ज्ञानगंगा क्लासजवळ दहावीच्या तीन विद्यार्थ्यांमध्ये बेंचवर बसण्याच्या कारणावरून वाद झाला आणि त्यातूनच एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आहे. मृत विद्यार्थ्याचे नाव यशराज तुकाराम गांगुर्डे (वय १६) असं असून तो सातपूरमधील एका शाळेत शिक्षण घेत होता.

ही संपूर्ण घटना शनिवारी सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास घडली आहे. यशराज गांगुर्डे हा नेहमीप्रमाणे ज्ञानगंगा क्लासमध्ये क्लासच्या बसने आला होता. बस क्लासजवळ पोहोचताच आधीच उपस्थित असलेल्या दोन विद्यार्थ्यांनी त्याच्यावर अचानक हल्ला केला.

हा वाद विकोपाला जाताच यशराजला छातीत जोरदार गुद्दे मारण्यात आले. मार लागल्याने त्याच्या नाकातून रक्त येऊ लागले आणि तो तिथेच चक्कर येऊन कोसळला. त्यानंतर त्याला तात्काळ तेथील स्थानिक रुग्णालयात नेण्यात आलं. मात्र, यशराजचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. या घटनेमुळे सध्या परिसरात एकच खळबळ उडाली.

दोन अल्पवयीन आरोपींवर खुनाचा गुन्हा

नाशिकच्या सातपूर परिसरात घडलेल्या या घटनेनंतर या प्रकरणी सातपूर पोलिसांनी दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. मात्र, हल्ला नेमका आधीपासून नियोजित होता का हे तपासलं जात आहे.

नाशिकमधील सातपूर येथील या घटनेमुळे संपूर्ण नाशिक शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे. शाळा आणि क्लास परिसरात मुलांच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केला जात आहे. पालकांमध्येही या घटनेमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अनेकांनी शाळा व क्लासमधील शिस्तबद्ध व्यवस्थेची मागणी केली आहे.

# 'आव्हाडला महागात पडणार', गोट्या गित्तेची धमकी! व्हिडीओत म्हणाला...

**बीड । प्रतिनिधी**

वेगवेगळ्या गुन्ह्यांअंतर्गत फरार असलेला बीडमधील कुप्रसिद्ध आरोपी गोट्या गित्तेने शरद पवारांच्या पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांना धमकी दिली आहे. धनंजय मुंडेंना बदनाम करू नका असं गित्तेने व्हायरल व्हिडीओमध्ये म्हटलं आहे. रेल्वे रुळांवर बसून शूट केलेल्या या व्हिडीओमध्ये आपण वाल्मीक अण्णा कराड यांचा कार्यकर्ता असल्याचं म्हटलं आहे. मात्र आपण त्यांच्यासोबत कशातही सहभागी नव्हतो असा दावा गित्तेनं केला आहे.

बिनबुडाचे आरोप करू नका

गोट्या गित्ते म्हणजेच ज्ञानोबा गित्तेचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. माझे कोणासोबत संबंध आहेत? वाल्मीक अण्णा कराडांसोबतचा मी एक कार्यकर्ता आहे. मी त्यांच्यासोबत



काही केलेलं नाही. माझा काही संबंध नाही. जितेंद्र आव्हाड, संदीप क्षीरसागर, खासदार सोनवणे आणि दमानिया मॅडम हे बिनबुडाचे आरोप करतात, असं गित्तेनं या व्हिडीओत म्हटलं आहे. दमानिया मॅडम म्हणतात कुठल्यातरी मुलीला मी उचलून नेलं अरे गुन्हा कुठे दाखल आहे? ते दाखवा माझ्यावर. जितेंद्र आव्हाड हे तर वंजाऱ्याचे आहेत. मी वंजारी असून मला लाज वाटते त्यांची. हे तर म्हणतात मी देवाचा मुखवटा चोरला कुठलातरी. खंडणी, चोरी आणि वाल्मीक अण्णाचा राईट हॅण्ड आहे असे बिनबुडाचे आरोप करू नका, असं गित्तेनं म्हटलंय.

# पवनराजे इंग्लिश स्कूलमध्ये साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**केज । प्रतिनिधी**

पवनराजे इंग्लिश स्कूल, केज येथे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन उत्साहात पार पडले. समाज परिवर्तनाचे प्रबळ साधन म्हणून कार्य करणाऱ्या साठे यांचे विचार आणि कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे होता.

कार्यक्रमाचे अध्यक्ष पवनराजे इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष खंडेराव चौरे होते. त्यांनी आपल्या भाषणात आण्णाभाऊ साठे यांचे जीवन कार्य विद्यार्थ्यांसमोर उलगडले. ते म्हणाले की, साठे हे केवळ साहित्यिक नव्हते तर ते



खऱ्या अर्थाने समाजासाठी लढणारे युगपुरुष होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य दलित, गरीब, मजुरांच्या न्यायासाठी वाहिले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मुख्याध्यापक अशोक मस्के सर व घुले सर होते. अशोक मस्के सर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, आजच्या पिढीने साठे यांच्या जाज्वल्य संघर्षातून प्रेरणा घेणे गरजेचे आहे. शिक्षण, मेहनत आणि सामाजिक भान हे त्यांच्या कार्याचे मूळ होते.

घुले सर यांनी आपल्या मनोगतातून साठे यांच्या साहित्याची सामाजिक जाणीवेची खोली उलगडली. त्यांनी सांगितले की, ‘फकिरा’, ‘बारखान्या’ यांसारख्या कादंबऱ्यांतून साठे यांनी सामाजिक विषमता, अन्याय आणि दडपशाहीविरुद्ध संघर्ष उभा केला.

कार्यक्रमात दळवे मॅडम यांनी देखील मनोगत व्यक्त करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता समाजाच्या वास्तव समस्यांकडे सजग दृष्टीने पाहिले पाहिजे. साठे यांच्या जीवनातून ते शिकता येईल.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन अजय भांगे सर यांनी केले. त्यांनी आपल्या शैलीत कार्यक्रमाला एक सुसंवादात्मक स्वरूप दिले. तर कार्यक्रमाच्या शेवटी अश्विनी मॅडम यांनी उपस्थित मान्यवरांचे, शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

या कार्यक्रमास चौरे मॅडम, डि.एस. चौरे सर, पठाण सर, पारखे मॅडम, केदार मॅडम, जाधव मॅडम, टेकाळे मॅडम, मुळे मॅडम, प्राची मॅडम, संजना मॅडम , अक्षता मॅडम, प्रगती मॅडम , अमृता मॅडम , लक्ष्मी मॅडम, सानिया मॅडम, विशाल सर, राऊत सर, काळे सर, निखिल भांगे सर ,यांच्यासह शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. ०४ ऑगस्ट २०२५ ● पान ४

## थोडक्यात

### जिल्ह्यात ३७ (१) (३) लागू

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, यासाठी महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) कलम ८ ऑगस्ट २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू करण्यात आले आहे. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणुका व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकीस लागू राहणार नाही व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अंमलात राहणार नाही. तसेच या आदेशाचे पालन करुन कोणाताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूवर्मान्यता घेणे आवश्यक असेल असेही आदेशात अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी नमूद केले आहे.

### सहकार पुरस्कारासाठी १८ ऑगस्टपूर्वी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील सहकारी चळवळीमध्ये उत्कृष्ट योगदान देणाऱ्या सहकारी संस्थांना राज्य सरकारमार्फत सन २०२३-२०२४ करिता सहकार पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. बीड जिल्हा कार्यक्षेत्रातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांनी या पुरस्कार प्रक्रियेत सहभागी व्हावे. त्यासाठी सहकारी संस्थाचे मुख्यालय असलेल्या तालुका सहायक निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे दिनांक १८ ऑगस्ट २०२५ पूर्वी दाखल करण्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक (बीड) सतिश तोटावार यांनी केले आहे. सहकार क्षेत्रात कार्यरत संस्थांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीकरिता प्रोत्साहित करण्यात येत असून, बीड जिल्हा उपनिबंधक कार्यालयात आत्तापर्यंत ११ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी बिगरशेती पतसंस्था व पगारदार नोकरांच्या पतसंस्था ११, नागरी सहकारी बँका, गृहनिर्माण संस्था, ग्राहक संस्था इतर समावेश आहे. सहकारी संस्थांना राज्य सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या सहकार पुरस्कारांची संख्या पुढीलप्रमाणे आहे. सहकार महर्षो पुरस्कार १, सहकार भूषण पुरस्कार २१, सहकारनिष्ठ पुरस्कार २३. या पुरस्कारांच्या सादरीकरणासाठी आवश्यक निकष व गुणांकन प्रक्रिया सहकार आयुक्तालयाच्या http:///sahakarayukta.maharash-tra.gov.in या संकेतस्थळावरील मुखपृष्ठावरील महत्वपूर्ण कार्यक्रम या टॅबवर पुरस्कार व कामगिरी येथे उपलब्ध आहे. पुरस्काराद्वारे आपल्याला सर्वसामान्य जनतेसमोर, सहकारी क्षेत्रातील अन्य संस्थांसमोर आपली कामगिरी सादर करण्याची संधी मिळेल व संस्थांना अधिक भरीव योगदान करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### बाजीराव पाटील विद्यालयात लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**




स्फुर्ती शिक्षण संस्था जांब संचलित बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जांब ता.शिरूर (का) जि बीड विद्यालयात दि १ ऑगस्ट २०२५ रोजी लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.सर्वप्रथम लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतीमेचे पूजन विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक खाडे टी व्ही व प्रमुख पाहुणे जामकर सर यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले सर्व प्रथम चि.बांगर ओमकार, चि सुरज सातपुते,चि.वेदांत खोपडे, चि समाधान सातपुते, कु.सिमरन शेख,आरती वाघमारे, अक्षरा सातपुते इ.विद्यालयाचे सहशिक्षक श्री जायभाये जे के.व व प्रमुख पाहुणे जामकर सर यांनी विद्यार्थ्यांना जयंती निमित्त मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक खाडे टी व्ही यांनी लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली.यावेळी उपस्थित विद्यालयाचे सहशिक्षक मिसाळ सर, मोराळे मॅडम, खेडकर सर, भांगे सर, पठाण सर,कराड सर,सोनवणे सर, मस्के सर, ढास सर, खेडकर शिवाजी मिसाळ बी एस ढोबळे अंबादास ,पवार भारत यांनी सहकार्य केले कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार श्री मोरे सर यांनी मानले.

# हरित बीड अभियानाच्या तयारीचा आ. नमिता मुंदडा यांच्याकडून आढावा

**अंबाजोगाई। प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात ७ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडणाऱ्या 'हरित बीड अभियान' या महत्त्वाकांक्षी वृक्षारोपण उपक्रमासाठी जिल्हा पातळीवर जोरदार तयारी सुरू असून, अंबाजोगाईतील सर्वे क्रमांक १७ या ठिकाणी होणाऱ्या वृक्षारोपण जागेचा प्रत्यक्ष पाहणी दौरा आमदार नमिता मुंदडा यांनी केला. यावेळी त्यांनी नगर परिषद मुख्याधिकारी प्रियंका टोंगे, स्वच्छता निरिक्षक अनंत वेडे यांच्याशी चर्चा करून आवश्यक सूचना दिल्या. या उपक्रमात एका दिवसात तब्बल ३० लाख वृक्षांचे रोपण करण्यात येणार असून, हा उपक्रम महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरणाऱ्या या मोहिमेसाठी संपूर्ण जिल्हा प्रशासन,



तालुका प्रशासन, शासकीय व खासगी संस्था, सेवाभावी संघटना, शाळा व महाविद्यालये यांची सक्रिय भागीदारी असून, सर्व यंत्रणा सज्ज झाल्या आहेत.

हरितक्रांतीचा संकल्प घेऊन सुरु झालेल्या या अभियानामुळे परिसराचे पर्यावरणीय संतुलन सुधारण्यास मदत होणार आहे. आ. मुंदडा यांनी या उपक्रमास शुभेच्छा देत नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा असे आवाहन केले.

## आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नातून बीड ते गोरक्षनाथ टेकडी बस सेवा सुरू: भाऊसाहेब डावकर

**बीड । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे प्रतिवर्षाप्रमाणे विसाव्या शतकातील महान संत ह. भ. प. किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यतिथी निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. शांतीब्रह्म ह. भ. प. नवनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेला सप्ताहास व श्रावण महिन्यात



सोमवारी भावीक भक्तांची प्रचंड गर्दी होते. भाविकांच्या सोयीसाठी आ. विजयसिंह पंडित यांनी राज्य परिवहन महामंडळाला बस सेवा तात्काळ सुरू करण्याची मागणी केली होती. त्या अनुषंगाने राज्य परिवहन महामंडळाने गोलरक्षक टेकडी येथे बस सेवा सुरू केली असून त्याचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन भाऊसाहेब डावकर यांनी केले आहे. बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी हे सर्व भाविक भक्तांचे श्रद्धास्थान आहे. श्रावण महिन्यात येथे भाविक भक्तांचा प्रचंड ओघ असतो, मात्र आजतागायत बस ▶ उर्वरित पान २ वर

## फार्मा डी पदवीधारकांना एमपीएससी ड्रग इन्स्पेक्टर पात्रते संदर्भात अडचणी दूर करा: डॉ.विनायक घायाळ

**माजलगाव । प्रतिनिधी**

डॉक्टर ऑफ फार्मसी असोसिएशन महाराष्ट्र आणि डॉक्टर फार्मसी वेल्फेअर सोसायटी यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोर्टलवर ड्रग इन्स्पेक्टर २०२५ पदासाठी अर्ज करताना पदवी धारकांना पात्र नाही असे दाखवले जात असल्याबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे ही बाब अत्यंत धक्कादायक आहे,कारण २०१६ मध्ये सुरू असलेल्या लढ्याच्या परिणामी २०१८ मध्ये फार्म डी ला एमपीएससी कडून पात्रता मान्यता मिळवली होती तरी आज अशा प्रकारे नाकारली जात आहे हे अत्यंत अन्यायकारक व निरसाजनक आहे डॉक्टर फार्मसी हा सहा वर्षाचा व्यावसायिक डॉक्टर पद्धतीचा अभ्यासक्रम आहे जो फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया कडून ▶ उर्वरित पान २ वर

# पर्यावरण मंत्री मा.पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त ३००० वृक्षांची भेट: बीडमध्ये घनवनाचा प्रेरणादायी उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील घाटसावळी येथील सामाजिक कार्यकर्ते श्री.चंद्रकांत फड यांनी महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री मा.पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त एक अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. पर्यावरण संवर्धनासाठी त्यांनी आपल्या स्वमालकीच्या जमिनीवर घनवन पद्धतीने तब्बल ३०००/ हजार वृक्षांची लागवड करून एक




सजीव जंगल निर्मितीचा संकल्प केला आहे. या वृक्षारोपणामध्ये पिंपळ, वड, कांचन, अडुळसा, मेहंदी, इंग्रजीचिंच, कडूलिंब, करंज, सिताफळ, शंकेश्वर, हातगा, बेल, शेवगा, काटेसावर, सिसम, चिंच, कवटउंबर, तुळस, कढीपत्ता, आवळा, आपटा, गावठी आंबा, रातराणी, कनेर, जास्वंद, बांबू, तुती,कोरफड अशा स्थानिक आणि उपयोगी वनस्पतींचा समावेश करण्यात आला आहे. हे संपूर्ण रोपण स्थानिक सामाजिक वनीकरण,वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली व वनस्पती संशोधकांच्या सल्ल्याने यात प्रा. पाटील अरुण सर, वनपाल मोरे, वनरक्षक केदार, बांगर मॅडम, सुरवसे मॅडम, सत्य वृक्ष पूजा रचनाकार महेशजी खरे, डोमरी गुरुकुल मुख्याध्यापक चव्हाण अण्णा ▶ उर्वरित पान २ वर

# आंदोलनाचे शास्त्र शिवसैनिकांना कळले पाहिजे

**आंदोलन करणे हे जिवंतपणाचे लक्षण आहे : सुषमा ताई अंधारे**
**मन-मेंदू-मनगट या सर्वबाबी उल्हास गिराम यांच्या बाबतीत परिपूर्ण**

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना उपनेत्या तथा प्रवक्त्या सुषमाताई अंधारे यांनी आज जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या जनसंपर्क कार्यालयास भेट दिली. आगामी निवडणुकी संदर्भात शिवसैनिकांशी सवांद साधला. ज्या ठिकाणी अन्याय, अत्याचार, सामान्य लोकांचे मूलभूत प्रश्न पायदळी तुडवली जातात तेव्हा लोकशाहीला साजेशी आंदोलने झाली पाहिजेत. शिवसैनिकांना



आंदोलनाचे शास्त्र कळले पाहिजे, आंदोलन करणे जिवंतपणाचे लक्षण असल्याचे यावेळी सुषमा ताई अंधारे यांनी शिवसैनिकांना सांगितले. जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे कौतुक सुषमाताईंनी केले. जिल्हाप्रमुख पदाच्या आजपर्यंतच्या कार्याची माहिती घेतली. शिवसैनिक व जिल्हाप्रमुख म्हणून मन - मेंदू - मनगट या सर्व बाबी उल्हास गिराम यांच्या बाबतीत परिपूर्ण असल्याचे ताईंनी सांगितले. दर वेळी हमारीतुंबरी वर येऊन शिवसैनिकांनी काम न करण्याचा सल्ला ही शिवसैनिकांना या वेळी सुषमा ताई अंधारे यांनी दिला. ▶ उर्वरित पान २ वर

# बर्वे कुल स्नेहवर्धक मंडळाच्या वतीने श्री योगेश्वरी मंदिरास अद्यावत छबिना पालखी सप्रेम भेट

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तथा कोकणस्थ ब्राम्हणांचे कुलदैवत श्री योगेश्वरी देवी मंदिरास बर्वे कुल स्नेहवर्धक मंडळाच्या वतीने छबिना पालखी सप्रेम भेट देण्यात आली आहे. रविवार दि ३ ऑगस्ट रोजी बर्वे कुल स्नेहवर्धक मंडळ पुणे यांच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रातील बर्वे कुटुंबाच्या वतीने शुद्ध सागवानी लाकडा पासून बनवलेली छबिना पालखी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संदीप बर्वे तसेच पुणे मंडळाचे अध्यक्ष तथा मिलिंद बर्वे



यांच्या उपस्थिती मध्ये श्री योगेश्वरी देवी मंदिरास सस्नेह भेट देण्यात आली. या छबिना पालखीवर पुणे येथील कारागिरांनी अतिशय सुंदर असे कोरीव नक्षीकाम केले असून त्या नक्षीकामामुळे व त्यावरील रंगरंगोटी मुळे ही छबिना पालखी अतिशय आकर्षक व सुंदर दिसून येत आहे. या छबिना पालखीची विधिवत पूजा व देवीची आरती करून पालखी मंदिर प्रशासनाच्या ▶ उर्वरित पान २ वर



*बीड येथे काळे व आगरकर परिवाराचा साखरपुडा कार्यक्रमानिमित्ताने अवांतर खर्च टाळत स्व.मनोज भाऊ भानोसे सामाजिक प्रतिष्ठान यांच्या वतीने अनाथ मुलांचे संगोपन करणाऱ्या बीड येथील स्नेहसवली फाउंडेशन व क्रांतिसूर्य सेवाभावी संस्था मातोरी येथील मुलांसाठी शालेय साहित्य भेट दिली व बीड येथे और असलेल्या सावता महाराज मंदिर ट्रस्ट ला एक्कावन हजार रुपयांची मदत या वेळी केली गेली.*

# माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांची आ.सुरेश धस यांचे निवासस्थानी सदिच्छा भेट

**• जुन्या स्मृतींना दिला उजाळा..**

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या राजकारणातील दिग्गज घराणे समजले जाणारे राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांनी आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. आष्टी राज्य परिवहन महामंडळात आगार वाहतूक



नियंत्रक मोहिते परिवाराचे नातेवाईक असलेले संजय संभाजीराव निंबाळकर यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमासाठी ते प्रामुख्याने उपस्थित होते. त्यानंतर त्यांनी आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी जुन्या स्मृतींना उजाळा देण्यात आला विजयसिंह मोहिते पाटील यांचे आजोळ असलेले ब्रह्मगाव हे आष्टी तालुक्यात असून आष्टीच्या जवळ आहे. यावेळी आ.सुरेश धस यांनी मोहिते पाटील यांच्याशी संवाद साधताना ..जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष नंतर आष्टी मतदार संघाचा लोकप्रतिनिधी म्हणून जेव्हा जेव्हा आपल्याकडे आलो तेव्हा आपल्याकडे या राज्याचे उपमुख्यमंत्रीपद,ग्रामविकास खाते असताना मतदार संघातील कामांना भरघोस निधी उपलब्ध करून दिला या आठवणींनी उजाळा देत.. आपल्या अद्वैतचंद्र निवासस्थानी ▶ उर्वरित पान २ वर